MHAH230006922024

नियमीत दिवाणी दावा क्रमांक २८०/२०२४

मधुकर कारभारी शिंदे ....वादी
वि.
१. अशोक कारभारी शिंदे ....प्रतिवादी

## निशाणी क्र. ५ खालील आदेश

[०१] प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९ नियम १ अन्वये मुळ दावा प्रलबिंत असे पावेतो प्रतिवादींनी वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये व दावा मिळकतीवर त्रयस्थ पक्षकारांचे हक्क व अधिकार निर्माण करण्यापासुन प्रतिवादींना रोखण्यासाठीच्या तात्पुरत्या मनाई हुकूमासाठी सादर केलेला आहे.

[०२] वादीच्या दाव्या व अर्जाप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाची मिळकत आहे. प्रतिवादी हे व्यवसायानिमित्त कायमस्वरुपी अहमदनगर येथे राहण्यास आहेत. त्यामुळे वादी हेच दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट करत आहेत. दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप आजतागायत वादी व प्रतिवादी दरम्यान झालेले नाही. वादीने दावा मिळकतीमध्ये बराचसा खर्च करून त्यामध्ये बोअरवेल घेतली असून दावा मिळकत पुर्णपणे बागायत केलेली आहे. वादी यांनी प्रतिवादींकडे दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करून त्याचा अविभक्त हिस्सा मागितला असता प्रतिवादींनी वाटप करुन देण्यास टाळाटाळ केली. प्रतिवादी यांनी दारुच्या व्यसनाच्याअधिन जाऊन दावा मिळकत प्रकाश नानेकर यांना विक्री करण्याचा व्यवहार केल्याचे वादी यांना माहिती मिळाली. त्यानंतर वादीने पुन्हा दिनांक २२/१०/२०२४ रोजी प्रतिवादी यांना दावा मिळकतीचे वाटप करून त्याचा अविभक्त हिस्सा मागितला असता प्रतिवादींनी त्यास नकार दिला व दावा मिळकत विक्री करणार अशी धमकी वादीस दिली. त्यामुळे वादीने मुळ दावा सरस-निरस मानाने वाटणी करुन मिळण्यासाठी दाखल करुन त्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज वर नमुद मागणीसह सादर केलेला आहे.

[०३] प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांची कैफियत व म्हणणे निशाणी २६ येथे दाखल करून त्यांनी सदर अर्जास विरोध दर्शविला. प्रतिवादींच्या कथनांनुसार वादी व प्रतिवादी हे सख्खे भाऊ असून दावा मिळकत ही एकत्र कुटूंबाची वडीलोपार्जित मिळकत आहे. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची सामाईक कब्जे वहिवाट आहे. प्रतिवादी क्र. २ यांचे वडील मयत झाल्याने प्रतिवादी क्र. २ तलाठी कार्यालय विसापुर येथे वारस नोंदीसाठी येत जात असल्याने त्याबाबत शंका उपस्थित करून सदरचा दावा वादीने दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांचे कुटूंबाचा विस्तार झाल्याने त्यांना दावा मिळकतीमध्ये एकत्रात

वहिवाट करून मिळकतीचा उपभोग घेण्यास अडचण निर्माण होत असल्याने दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होणे आवश्यक आहे. प्रतिवादीने वादीस त्याच्या मागणीप्रमाणे दावा मिळकतीमधील हिस्सा देण्यास तयार आहेत. तरीदेखील वादीने खोटा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या खरेदीविक्री बाबत कोणताही व्यवहार केलेला नाही. दावा मिळकती संदर्भातील वादाचे दावा दाखल करण्यापुर्वी वादी व प्रतिवादी दरम्यान आपसात निराकरण झाले असते. परंतु, वादीने तसा कोणताही प्रयत्न न करता प्रस्तुत दावा दाखल करून वादीला मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास दिलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नांमजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

[०४] प्रस्तुतच्या अर्जाच्या समर्थनार्थ वादींच्या वतीने अभिलेखावर वादीचे शपथपत्र, दावा मिळकतीचा ७/१२ उतारा व फेरफार क्र. १७०५, २७२० चा उतारा इत्यादी दस्तऐवज सादर केलेले आहेत.

[०५] अर्जाच्या सुनावणीवेळी वादीतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता ते युक्तीवादासाठी हजर राहिलेले नाहीत. परिणामी, प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या युक्तीवादाशिवाय पुढे चालविण्यात आला.

[०६] वादपत्र, प्रस्तुतच्या अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे व दोन्ही बाजुंच्या वतीने अभिलेखावर सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या अर्जाच्या सुनावणीवेळेस खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यांचे निष्कर्ष खाली नमुद करण्यात आलेल्या कारणानुषंगे त्यापुढे नमुद करण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने तिचा दावा सकृतदर्शनी सिध्द केला आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | अनुकूलतेचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय ? | होकारार्थी. |
| ३. | जर तात्पुरता मनाई हुकूम दिला गेला नाही तर वादीचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे काय ? | होकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमीमांसा**

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता**

[०७] वादपत्र, प्रस्तुतच्या अर्जाचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०८] पुढे जाण्यापूर्वी हे नमुद करणे गरजेचे आहे की, वादीच्या कथनावरुन वादी व प्रतिवादी हे सख्खे भाऊ आहेत. म्हणजेच वादी व प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुटूंबाचे सदस्य आहेत. वादी व प्रतिवादी यांच्या कथनानुसार दावा मिळकत ही त्यांची हिंदू एकत्र कुटूंबाची वडीलोपार्जित मिळकत असून तिचे अदयाप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. वादीने त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ दावा मिळकतीचे सातबारा उतारा निशाणी क्र. ३ सोबत अ.क्र. १ व २ येथे दाखल केला असून दावा मिळकतीची फेरफार उतारे निशाणी क्र. ३ सोबत अ. क्र. ३ व ४ येथे सादर केलेले आहेत. वादीने दाखल केलेल्या फेरफार क्र. १७०५ व २७२० वरील नोंदीवरून दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या नावे वारसा हक्काने आल्याचे दिसुन येते. अर्थातच, वादीने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरून दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुंटूबाच्या मिळकती असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते.

[०९] उपरोक्त विवेचनानुसार दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांची वडीलोपोर्जित मिळकती असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. कायदयाच्या प्रचलीत तत्वानुसार वडीलोपार्जित मिळकतीमध्ये प्रत्येक सहदायकाचा समान हिस्सा असतो. प्रस्तुतचा दावा वादींनी वाटपासाठी दाखल केलेला असल्यामुळे अर्थातच वादींना किती हिस्सा प्राप्त होतो हे देखील दाव्याच्या अंतिम चौकशीवेळी निश्चीत होणारे आहे. अर्थातच वाटपाच्या दाव्यामध्ये दावा मिळकती संदर्भात वादी व प्रतिवादी यांचे हक्कसंबध निर्माण झालेले असतात. अशा परिस्थीतीत दावा प्रलंबित असताना दावा मिळकती त्रयस्थ व्यक्तीस हस्तांतरीत केल्यास अथवा त्यावर त्रयस्थ व्यक्तीचा बोजा निर्माण झाल्यास दाव्याची विविधता वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही. एकुणच दोन्ही बाजुच्या वतीने सादर दस्तऐवज व शपथपत्रांच्या अवलोकनावरुन वादींनी त्यांचा दावा सकृतदर्शनी सिध्द केल्याचे स्पष्ट होते.

[१०] वादीने दावा सकृदर्शनी सिध्द केलेला असल्यामुळे, अनुकुलतेचा समतोल देखील त्यांच्या बाजुने आहे. अशा परिस्थितीत जर वादींनी मागितल्याप्रमाणेचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश नाकारण्यात आल्यास, प्रतिवादी हे दावा मिळकतीवर त्रयस्थ पक्षकारांचे हक्क व अधिकार निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर त्यांनी दावा मिळकतींवर त्रयस्थ पक्षकारांचे हक्क व अधिकार निर्माण केल्यास दाव्याची विविधता वाढेल व वादींनी ज्या उद्देश्याने दावा दाखल केलेला आहे तो उद्देशच असफल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे घडल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे एकुणच वरनमुद विश्लेषणाचा विचार करता, विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येतात.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>**

[११] उपरोक्त विवेचनानुसार वादी व प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुटूंबाचे सदस्य असून

दावा मिळकत ही त्यांची हिंदू एकत्र कुटूंबाची वडीलोपार्जित मिळकत असल्याचे स्पष्ट होते. हिंदु एकत्र कुटूंबाच्या वडीलोपार्जित मिळकतीमध्ये सर्व सहदायक यांची सामाईक कब्जे वहिवाट असते. त्यामुळे एक सहदायक दुस-या सहदायकाविरुध्द कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त मनाई मागणी करू शकत नाही. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्जात दावा मिळकतीमधील त्याच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करू नये अशी प्रतिवादींविरुध्द केलेली विनंती फेटाळणे न्यायोचित ठरते. अर्जातील नमूद कारणे व निरीक्षण ही या अर्जाचे निकाल निश्चितीपुरतीच मर्यादीत राहतील. दाव्याचा अंतिम निकाल दावा गुणदोषावर चालण्यावर अवंलबून राहिल. त्यामुळे सद्य स्थितीत अर्जाचा खर्च कोणाही एका पक्षकारावर लादणे न्यायोचित होणार नाही. अर्जाचा खर्च देखील मुळ दाव्याच्या निकालावर विसंबून असेल. सबब मुद्दा क्र. ४ चे उत्तराकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

**(१)** अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**(२)** प्रस्तुतच्या तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या आदेशाद्वारे प्रतिवादीं यांना किंवा त्यांच्या मार्फत इतरांना दावा मिळकतींवर पुढील आदेशापावेतो कसल्याहीप्रकारे त्रयस्थ इसमांचे हक्क व अधिकार निर्माण करण्यापासुन रोखण्यात येत आहे.

**(३)** वादीने प्रस्तुत अर्जात दावा मिळकतीमधील त्याच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करू नये अशी प्रतिवादींविरुध्द केलेली विनंती फेटाळण्यात येते.

**(४)** निशाणी क्रमांक ५ च्या खर्चाची रक्कम मुळ दाव्यात ठरविली जाईल.

**(५)** दोन्ही बाजुंच्या पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

**(६)** सदरचा आदेश पीठासनावरुन उद्घोषित करण्यात आला.

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2026.02.02 11:10:23 +0530

(प्रविण वि. पाटील)

दिनांक:- ०२-०२-२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

**-: <u>प्र मा ण प त्र</u> :-**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन.डी.दावत (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नांव | : | सह दिवाणी न्यायाधीश तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| आदेश घोषित केल्याचा दिनांक | : | ०२-०२-२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | ०२-०२-२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | : | ०२-०२-२०२६ |